# संगीत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - ५१वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कऱ्हाड १९७५- स्मरणिका, अभिरुची ग्रामीण व नागर - संपा. गो. म. कुलकर्णी १९७६)

आपण अभिरुचीचा विचार करू लागणे याचा अनुकूल अन्वयार्थ असा की, रसिकतेच्या व्यक्तिसंबद्ध वर्तुळापलीकडे जाऊन आपला कलाविचार, अधिक व्यापक अशा सामाजिकतेला सामावून घेण्याचा प्रयत्न करू पाहत आहे. निदान संगीतापुरते तरी हे आवश्यक म्हटले पाहिजे. कारण आज संगीताला मुख्य आश्रय आहे तो सर्वसामान्य जनता वा तिचे प्रतिनिधित्व करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या शासनाचा. संगीत आणि संगीतकार यांना मिळणाऱ्या आश्रयात ग्रामीण आणि नागर अभिरुचीतील तफावत प्रतिबिंबित होत असल्याने त्याचा विचार महत्त्वाचा ठरतो. या आवश्यकतेला आर्थिक वास आला तरी विचारविषय बनण्याच्या संदर्भात याची काही अडचण होऊ नये. कारण संगीतासारखी प्रयोगसिद्ध कला या ना त्या टप्प्यावर श्रोते-प्रेक्षक यांची उपस्थिती आणि ग्रहणक्षमता, आविष्कार ज्या परिस्थितीत सादर होतो तिचे स्वरूप, इत्यादींशी संलग्न होते. परिणामतः निर्मिती, आविष्कार, आस्वाद आणि शिक्षण या चारी कलासंबद्ध अंगांवर नागर–ग्रामीण कलाभिरुचीतील तफावत ठसा उमटविल्याशिवाय राहात नाही.

ग्रामीण-नागर कला अभिरुचीतील तफावतीला नेमके कोणते स्वरूप आले आहे हा प्रश्न प्रथमतः विचारात घेतला पाहिजे. वास्तविक पाहता असे म्हणता येईल की एकाच समाजाचे घटक असणाऱ्या ग्रामीण आणि नागर जीवनाच्या विविध अंगांचे एकमेकांशी निरनिराळ्या प्रकारचे संबंध असतात. या संबंधांचे स्वरूप फरक किंवा भेद म्हणून प्रतीत होऊ शकते किंवा तफावत म्हणूनही. या परस्परसंबंधांना तफावत म्हणण्यात विशिष्ट प्रकारचे परस्परसंबंध योग्य त्या प्रकारचे नाहीत, त्यांतला फरक इष्ट नाही असा ध्वनी निघतो. या परस्परसंबंधाचे वर्णन फरक वा भेद असे करण्यात एक प्रकारचा तटस्थपणा आहे. हा फरक योग्य की अयोग्य या विषयीचा कोणताच निर्णय इथे घेतलेला नाही. असा निर्णय घेणे योग्य नव्हे, कारण ग्रामीण-नागर हे वर्गीकरण मुळात आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी कलाबाह्य व्यवहारक्षेत्रातले आहे. या व यासारख्या वर्गीकरणाच्या आधारे ज्याचा शोध घेतला जात असतो ते सत्य मूलतः कलाविचारसंबद्ध नसते. आर्थिक, राजकीय इत्यादी व्यवहारांचा परिणाम कलाक्षेत्रात दिसणे याचा अर्थ असा नव्हे की हा परिणाम कलाविचाराचा विषय बनणे अपरिहार्य ठरावे. ग्रामीण-नागर हे स्तर असणे, त्यांचे अस्तित्व जमेस धरणे आणि त्यांचे परिणामही गृहीत धरणे हेच वैचारिक प्रौढतेचे लक्षण ठरेल. ग्रामीण-नागर जीवनातील फरक हे एक सांस्कृतिक सत्य आहे. समाजाच्या अविरत चालू राहणाऱ्या जडण-घडणीतील ती एक न टाळता येण्याजोगी घडामोड आहे. ग्रामीण-नागर पातळयांमधील परस्परसंबंधांचे वर्णन 'तफावत' असे करण्यापेक्षा फरक वा भेद असे करणे ही एक निकोप वैचारिक कृती ठरेल. या तऱ्हेचा फरक कलाभिरुचीसकट सर्व जीवनांगांत नेहमी असणार व असतो हे मान्य करणे हीही एक कार्यक्षेत्र स्पष्ट करणारी कृती ठरेल. ग्रामीण-नागर भेद असण्याची कारणे अनेक जीवनांगे, व्यवहारक्षेत्रे आणि क्रियापद्धती यांच्याशी निगडित झाल्याने कलाविचार व तत्संबद्ध विज्ञानांच्या आधारे ग्रामीण-नागर भेदांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची मांडणी करणे वा त्यांची उत्तरे शोधणे सयुक्तिक ठरणार नाही. त्या भेदांचा कला व कलाभिरुची यांच्याशी संबंध पोहोचतो या घटनेने न फसता प्रस्तुत प्रश्न संस्कृतिसमीक्षा करणाऱ्यांचा आहे याचे भान आपण ठेवणे आवश्यक आहे, एवढे नोंदवून पुढे विचार चालविला पाहिजे.

ग्रामीण-नागर कलाभिरुचीतील भेद ही एक अपरिहार्य सांस्कृतिक घटना म्हणून स्वीकारण्याची गोष्ट होय. मग हिचा विचार का करावयाचा? या भेदांनी चिंताग्रस्त का व्हावयाचे? याला कारण असे की ग्रामीण-नागर कलाभिरुचीतील भेदाने तीव्र स्वरूप धारण केले की, कलाक्षेत्रात एक प्रकारचा दुभंगलेपणा येतो. निर्मिती, आस्वाद, आविष्कार आणि शिक्षण या चारी कलासंबद्ध अंगांना एक छेद जातो. वरील चारी अंगाना मर्यादित आस्वादकवर्ग, काहीसे साचेबंद निर्मितिप्रयोग, बाजारू वाटण्यासारखे आविष्कारसंकेत

आणि वरवरचे, दिशाहीन शिक्षणप्रयत्न यासारख्या रोगांची लागण होते. या साऱ्या गोष्टी आज व्हायला लागल्या आहेत, असे कशाच्या जोरावर म्हणावयाचे असा प्रश्न पडेल. कारण म्हटले तर या साऱ्याच गोष्टी काहीशा अमूर्त आहेत. आधार आहे तो काही मूर्त परिणामांचा. पैकी काही महत्त्वाचे पुढे नोंदले आहेत.

१) एका काळी ग्रामीण व 'लोककलाविष्कार' बरेच समकक्ष असत. आता ते तसे नाहीत. आज ग्रामीण विभागात मुख्यतः जनताप्रिय (पॉप्युलर) आविष्कार स्वीकारले जातात आणि रूढ होतात. विविध कलांमधील खास आविष्कारसंकेत, निर्मितिपद्धती इत्यादींची जागा काहीशा ढोबळ, गुळगुळीत, सहजपणे अनुकरणीय व सर्वसामान्य आविष्कारसंकेतांनी बळकावणे, हा जनताप्रिय आविष्कारांचा विशेष होय. जनतासंपर्क माध्यमांच्या सरसकट उपयोगामुळे रुजणे हेही जनताप्रिय आविष्कारपरंपरांचे एक महत्त्वाचे लक्षण होय. आज ग्रामीण भागात कोणते संगीत आढळते, याचा विचार केला तर ते चित्रपट, आकाशवाणी, ध्वनिमुद्रिका या माध्यमांद्वारा पोहोचणारे सरसकट संगीत असते असे दिसून येईल. ग्रामीण भागात आपल्या कार्यबद्धतेमुळे लोकसंगीत वावरते, पण त्याचा प्रवाह क्षीण झाला आहे. लोक काय गुणगुणतात, काय शिकू पाहतात आणि कशाला महत्त्व देतात या प्रश्नांना उत्तर म्हणून आता ग्रामीण विभागात लोकसंगीताचा निर्देश करता येणार नाही.

२) ग्रामीण विभागात लोकसंगीताला उतरती कळा लागली आहे. तमाशासारखे रंजनात्मक कीर्तन-भजनासारखे धार्मिक किंवा इतर उत्सवी संगीत, या सर्वांवर शहरी आविष्कारसंकेतांची छाप पडली आहे. पदन्यास, आवाजाची फेक, वापरलेल्या चाली, हातवारे आणि वेषभूषा या सर्वांवरचा शहरी ठसा सहजपणे दिसून येतो आणि खुपतोही. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागात आविष्कार, निर्मिती, शिक्षण वा आस्वाद या साऱ्यांचा विषय आता लोकसंगीत नाही. संगीतापुरते बोलावयाचे तर समाजमनाचा होरा ग्रामीण विभागात कुठे वाहतो असे आता विचारावे लागत नाही. कारण लोकसंगीतातून आता ग्रामीण विभाग आपली मनोगते व्यक्त करीत नाही.

३) उलटपक्षी नागरविभागात मात्र आजकाल लोकसंगीताची प्रतिष्ठा वाढती आहे. प्रतिष्ठा वाढती आहे याचा अर्थ त्याला मागणी आहे. मात्र "जीवनसरणीशी एकरूप होत नैसर्गिकपणे वाहता राहणारा एक संगीत प्रवाह" असे या वाढत्या प्रतिष्ठेतून हाती लागणाऱ्या संगीताचे वर्णन करता येत नाही. या वाढत्या प्रतिष्ठेमागे एक प्रकारचा हळवेपणा आहे, फॅशनस्वरूप तकलुपीपणा आहे आणि बऱ्याच अंशी एक नकर्ती स्वीकृती आहे. यामागे लोकसंगीताच्या स्वरूपाची जाण दिसत नाही. कोणत्याही तऱ्हेचा निर्णय घेतल्याचे फलित म्हणून लोकसंगीत नागरी अभिरुचीचा भाग बनले आहे असे आढळत नाही. सांस्कृतिक बाबतींतले नागरी नेतृत्व ही एक 'मिथ्याकथा' आहे असे वाटण्याइतकी अगतिकता या बाबतीत दिसून येते.

४) जीवनातील कलात्मता प्रत्यक्ष कलाविष्कारापुरती मर्यादित ठेवण्याकडे वाढता कल आहे. कलावंतांची कलात्मता व्यवसायापुरती आणि लोकांची कलात्मता कलावंतांच्या सुपूर्त केलेली असा प्रकार झाला आहे. ऐकणाऱ्यांचे प्रमाण, कानावर संगीत पडून देणाऱ्यांचे प्रमाण आणि गुणगुणणाऱ्यांचे प्रमाण यांचा समतोल बिघडला आहे.

५) आणखी एक काहीसा विचित्र परिणाम म्हणजे ग्रामीण व नागर या दोन्ही जीवनशैलींमध्ये संगीत 'जेश्चर' म्हणून प्रभावी राहिलेले नाही. जेश्चरचा इथे एक विशिष्ट अर्थ अभिप्रेत आहे. हालचाल, मुद्राभिनय, आवाजाचा धर्म, शब्दांचा शैलीबद्ध वापर इत्यादी अनेक अंगाचा नेमका उपयोग होऊन (संगीताच्या कोणत्याही प्रयोगात) संगीत, सांगीतिक आशयाखेरीज इतरही अनेक जीवनार्थांचे कमी-अधिक सूचन करीत असते. आज एका अर्थाने संगीताचे 'जेश्चर' म्हणून विघटन झाले आहे. भक्तिगीताबरोबर भावगीतासारखे हावभाव, शास्त्रीय संगीतात हलक्या भावगीतांसारखे खोटे भावपूर्ण उच्चार, लोकसंगीतात शहरी म्हणून शिरलेला बटबटीत नखरा ही सारी उदाहरणे जेश्चर म्हणून वावरणारे संगीत विघटित झाल्याची. एक समग्र अर्थसंपर्ककारी पद्धती म्हणून संगीत

आता वावरू शकत नाही. कारण नागर व ग्रामीण संगीताभिरुचीमध्ये गल्लत होऊ लागली आहे. वास्तविक पाहता भाषा, वेषभूषा, रीतीभाती इत्यादी इतर अंगांतही ही गल्लत झालेली आपण नेहमीच पाहतो आणि ही विसंगती आपल्याला बोचतेही पण अनेक कारणांमुळे संगीताच्या बाबतीत यासंबंधी आपण फारसे जागरुक राहिल्याचे आढळत नाही.

ग्रामीण-नागर अभिरुचीतील फरकाच्या परिणामांची ही संपूर्ण यादी नव्हे आणि नोंदलेल्या परिणामांची चर्चासुद्धा अधिक तपशीलात करता येईल ही गोष्ट उघड आहे. पण विषयाची त्रोटक पण सर्व बाजूंनी ओळख करून घेणे हा या लेखाचा हेतू असल्याकारणाने उपाययोजनेच्या बाजूकडे आता वळण्यास हरकत नाही.

उपाययोजना, आविष्कार, निर्मिती, आस्वाद आणि शिक्षण या चारी कलांगांच्या बाबतीत व्हायला पाहिजे ही गोष्ट एका अर्थाने न उल्लेखण्याइतकी उघड आहे. तरीही निर्देश करणे आवश्यक वाटते, कारण सर्वसाधारणतः कलांच्या बाबतीत, शिक्षणाचे अंग ग्रामीण व नागर पातळीवर फार विषम असलेले आढळते. ग्रामीण कलावंतांना शहरात व नागर कलावंतांना अ-नागर भागात आविष्काराची संधी मिळते. आस्वाद घेणे हे त्या मानाने सोपे झाले आहे. (जनतासंपर्कमाध्यमांच्या संदर्भात हे सहज जाणवते). पण शिक्षणाच्या सोयी मात्र ग्रामीण भागात अतिशय निकृष्ट दर्जाच्या असतात. वरील चारी कलांगे तसे पाहता जरी एकमेकांशी निगडित असली तरीही शिक्षणाच्या अंगाकडे अधिक लक्ष द्यावयास हवे हा मुद्दा. जरा अधिक सूक्ष्म भेद करावयाचा तर असे म्हणता येईल की आमच्या शिक्षणात विद्याग्रहणाच्या सोयी होत आहेत. पण विद्यादानाची स्थाने तयार नाहीत. वाचनालये, ध्वनिमुद्रिकासंग्रह, आकाशवाणी, चित्रपट यांनी प्रसार साधतो, पण अभ्यासाची अवस्था अध्ययन-अध्यापनानंतर येते. निदान संगीताच्या बाबतीत ग्रामीण भाग शिक्षणाच्या संधी मिळण्याच्या दृष्टीने उजाड आहे. (इथे शिक्षणाच्या सोयी म्हणताना साधनसामुग्री अभिप्रेत नसून मार्गदर्शन वा तांत्रिक कौशल्ये प्रत्यक्ष संक्रांत करू शकणाऱ्या गुरुजनांचा अभाव प्रामुख्याने निर्देशित करावयाचा आहे.)

शिक्षणाच्या टप्प्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे कारण आता जनतासंपर्कमाध्यमांच्या वैपुल्यामुळे आणि विविधतेमुळे अपेक्षा वाढल्या आहेत. या माध्यमांद्वारा समोर येणारे संगीताचे नमुने हे साहजिकपणे आदर्श म्हणून समोर ठेवले जातात आणि परिणामतः अभिरुचीचे मानदंड म्हणून या आदर्शाचा जाणीवपूर्वक व अजाणता पण अपरिहार्यपणे उपयोग केला जातो. प्रत्यक्ष मार्गदर्शनाच्या सोयी नसल्यामुळे केवळ अनुकरणाद्वारे का होईना पण या आदर्शावर आपला आविष्कार बेतण्याचे ग्रामीण कलावंतांचे प्रयत्न चालू राहतात. अनेक वेळा जे सोपे व कमी अर्थपूर्ण त्याचे अनुकरण केले जाते व आविष्कार तिथेच खुंटतो. अशा तऱ्हेने वाढलेल्या आणि वाढत्या अपेक्षांच्या तुलनेने खुरटे असलेले शिक्षणप्रयत्न आणि जनतासंपर्कमाध्यमांच्या अविरत उपयोगातून निर्माण होत राहणारे तणाव यामुळे ग्रामीण नागर कलाक्षेत्रांतील फरक मन खचविणारी परिस्थिती निर्माण करतो.

वरील विवेचनातून सहजपणे निघणारा मुद्दा म्हणजे जनतासंपर्कमाध्यमांचा आपण करीत असलेला उपयोग. आकडेवारी पाहिल्यास प्रभावी वाटणारा आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट आणि ध्वनिमुद्रिका यांचा प्रसार योग्य उपयोजनाचे चिन्ह मात्र नव्हे. असे वाटण्यास काही विशेष कारणे आहेत. पुढीलपैकी काही कारणे विचारार्थ ठरली तरीही जनतासंपर्कमाध्यमांचा आपला उपयोग डोळस नाही असे पटेल.

१) माध्यमांचा विकासवेग आणि विकासाची इतर अंगे यांचे नाते डोळ्यांसमोर ठेवून कलाभिरुचीच्या क्षेत्रांत ही माध्यमे राबविली जातात असे दिसत नाही. उदाहरणार्थ साक्षरता आणि वाङमयीन अभिरुचीविषयक कार्यक्रम, सांगीतिक प्रसार आणि रूढ सांगीतिक साच्यामुळे जनमानसात तयार झालेली सांगीतिक पार्श्वभूमी यांचे परस्परसंबंध कसे असावेत हा प्रश्न कार्यक्रमांच्या आखणीत महत्त्वाचा ठरला पाहिजे. असे झालेले दिसत नाही.

२) जनतासंपर्कमाध्यमे कोणत्या मनोगत प्रक्रियांमुळे परिणामकारी होतात व प्रभावी ठरतात या विषयीच्या अद्ययावत संशोधनाचा माध्यमांच्या उपयोजनात दक्ष पाठपुरावा झालेला दिसत नाही. साक्षर, नवसाक्षर, सुशिक्षित, सुसंस्कृत आणि साधक-कलावंत अशा तऱ्हेचे वर्गीकरण सर्व कलाक्षेत्रांत शक्य असते. या सर्वांच्या अभिरुचीविषयक गरजा भिन्न भिन्न असूनही कार्यक्रमाचे साचे बदलत जात नाहीत. कार्यक्रमांना दिला जाणारा वेळ, प्रक्षेपण वेळ, भाषा वा विषय अशा ढोबळ मार्गदर्शक तत्वांवरच माध्यमांचे कार्यक्रम बेतले जातात. संगीतात शास्त्रीय-उपशास्त्रीय, कंठसंगीत-वाद्यसंगीत या वर्गीकरणाने कार्यक्रम योजले जाण्यात अभिरुचीच्या निरनिराळ्या पातळ्या आणि संबधित गरजा यांचे भान न दिसता आविष्कारांचे ठोकळेबाज वर्गीकरण दिसते. अभिरुचीविषयक गरजेप्रमाणे ठोस उपदेश, आवाहन, सूक्ष्म सूचना, बुद्धिवादी वा युक्तिवादी पातळीवरील मोकळी चर्चा यांचा उपयोग व्हावयास हवा. असे दिसत नाही. हसत-खेळतपणाचा अतिरेक, भावुकपणा आणि भाविकपणा यांना अवेळी आलेले उधाण, नीरसपणे केलेला उपदेश आणि सांकेतिक पद्धतीचा कुठेच न नेणारा बुद्धिवाद यांचा आढळच जास्त होतो. संगीतावरले पाठ, संगीतकारांच्या जयंत्या-मयंत्या, संगीताचे कार्यक्रम इत्यादी सर्व प्रकारांत कमी-अधिक प्रमाणात माध्यमे आणि माध्यमांनी उंचावणाऱ्या अपेक्षा यांचे भान सुटलेले दिसते.

३) जनतासंपर्कमाध्यमे कोणत्या पद्धतीने कार्य साधतात, त्यांचे स्वरूप काय यासबंधींचे निरनिराळ्या माध्यममहर्षींचे विवरण पाहता ज्या संस्कृतीत माध्यमे कार्य करू लागतात त्या संस्कृतीची प्रकृती प्रथम विचारात घेऊन माध्यमे राबविली पाहिजेत हे लक्षात येते. आपली ग्रामप्रधान, मौखिक परंपरेने भारलेली, धार्मिकतेने (धर्मप्रधानतेने नव्हे) भरलेली संस्कृती आणि वेगवेगळ्या माध्यमांची वैशिष्ट्ये यांचा स्वतंत्रपणे विचार न करता माध्यमे आपल्याकडे राबविली जातात. शब्दाच्या प्रयोगित स्वरूपापेक्षा लिखित आणि मुद्रित स्वरूपाचा आपल्यावरील पगडा सर्वत्र दिसणे हा या माध्यमांच्या सरधोपट वापराचा एक पुरावा आहे. आधी म्हटल्याप्रमाणे माध्यमांचे उपयोजन नीट होत नाही असे अनेक कारणांसाठी वाटते. वरील तीन कारणेसुद्धा उपयोजन नीट होणे आवश्यक आहे, हे पटवून देऊ शकतील.

शिक्षण, वाढत्या अपेक्षांची जाणीव आणि जनतासंपर्कमाध्यमांचा अधिक सहेतुक आणि शास्त्रशुद्ध उपयोग याबरोबर ग्रामीण-नागर कलाभिरुचीतील भेदांची तीव्रता कमी करण्याचा आणि एक महत्त्वाचा मार्ग आहे. ग्रामस्थांनी शहरी अभिरुचीकडे आणि शहरी आविष्कार आणि त्यांचे कर्ते यांनी सारखे परदेशाकडे तोंड वळविलेले ठेवणे हे महत्त्वाचे व पुढारलेले असते असा ग्रह झालेला आढळतो. प्रगतिशीलतेचे, पुढारलेपणाचे, रसिकतेचे जणू काही एकमेव गमक हेच झाले असल्याचा भास होतो. आपण आत्मसंतुष्ट आणि आत्मकेंद्रित नसावे हे जितके खरे आहे तितकेच आपण आपले आणि आपल्या भोवतालचे संगीत नीट जाणून घेणे तातडीचे समजायला हवे हेही खरे. प्रत्येक प्रांताने आपल्या नजीकच्या प्रांतांचे संगीत जाणून घेणे व भारतीयांनी पुरातन व सांगीतिक संबंध असलेल्या देशांचे संगीत अभ्यासणे या दिशेने आपली पावले पडली पाहिजेत. अभिरुचीचे एकारलेपण कमी व्हायचे तर गाव-शहर-प्रांत-नजीकचे प्रांत यांत सांगीतिक माहितीची देवाणघेवाण व्हायला हवी. आज गाव-शहर आणि शहर-परदेश असा एकदिश आणि फसव्या आंतरराष्ट्रीयतेला भाळून गेलेला सांगीतिक प्रवाह वाहत असलेला दिसतो.

अभिरुचीत फरक असतो कारण अभिरुचीत बदल होऊ शकतो. कलाभिरुचीतला बदल हे जीवनाच्या सर्वांगीण बदलाचे एक अपरिहार्य अंग आहे. पण त्याचे स्वतःचे असे गतिशास्त्र असते कारण कलेचे मूलभूत स्वरूप इतर जीवनव्यवहारापेक्षा अमूर्त असते. आर्थिक, शासकीय इत्यादी बाबतीत अधिक चांगले गाव म्हणजे शहर असे कदाचित म्हणता येईल व विकासाची वाटचाल 'गांवातून नगराकडे' अशी एकाच दिशेने असू शकेल. कलाभिरुचीच्या बाबतीत मात्र ग्रामीण व नागर पातळ्या निराळ्या आहेत. वरिष्ठ-कनिष्ठ नाहीत इतकेच नव्हे तर त्यांत देवाण-घेवाण झाल्याशिवाय दोन्हींचे स्वरूप कृत्रिम व ऊबळलेले राहण्याचा धोका असतो. कलाभिरुचीतील बदल हा सर्वांशांनी शिक्षण आणि माहितीचा प्रवाह यामुळे (केवळ सुलभपणे नव्हे तर प्रभावीपणे) होतो.

ग्रामीण-नागर अभिरुचिभेद वेगवेगळ्या घटकांच्या स्वरूपानुसार, कमी-अधिक प्रमाणात पण राहणारच. हा भेद घातक तीव्रतेचा होऊ नये म्हणून ग्रामीण-नागर पातळ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळेपण मान्य करून त्यांच्यामध्ये माहितीचा प्रवाह खेळता राहिला पाहिजे. जनतासंपर्कमाध्यमांचा सुजाण उपयोग करणारी यंत्रणा आणि त्याकडे दक्षतेने पाहणारी संस्कृति-समीक्षा यांची आज नितांत आवश्यकता आहे.

---